## Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेसनोट दि. २१/०२/२०२०**

**अल्पवयीन मुलांचे पालकांना समुपदेशन केले बाबत**

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील वाहतुक शाखेकडील कारवाई**

आजकाल दिवसेंदिवस अल्पवयीन मुलांमध्ये वाहन चालवण्याचा वाढता क्रेझ आणि स्टंटबाजी व त्यावर केले जाणारे व्हिडीओ यामुळे शाळेतील मुले अल्पवयीन वयातच विनापरवाना वाहन चालवताना दिसत आहेत. त्याचप्रमाणे पालकांचे मुलांकडे केले जाणारे दुर्लक्ष यामुळे वाढत जाणारे अपघात, गुन्हेगारी यांना आळा बसविण्याकरीता पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेकडुन शाळांमध्ये जावुन वाहतुकचे नियम पाळावेत याबाबतचे समुपदेशन करण्यात आले असुन त्यामध्ये अल्पवयीन मुलांच्या पालकांना व अल्पवयीन मुलांना वाहतुकीचे नियम व त्यांचे पालन करण्याबाबत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी समुपदेशन केले आहे. त्यादरम्यान वाहतुक शाखेकडुन आत्तापर्यंत एकुण ९८ पालकांना लेखी समज देण्यात आली आहे.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड मा.पोलीस आयुक्त श्री.संदीप बिष्णोई, मा.अपर पोलीस आयुक्त श्री. रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त निलीमा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड वाहतुक शाखा सर्व पालकांना आवाहन करते की, आपल्या अल्पवयीन मुलांना विनापरवाना वाहन चालवण्यास देण्यात येवु नये. त्याचप्रमाणे विनापरवाना अल्पवयीन मुले वाहन चालवताना निदर्शनास आल्यास त्यांचेवर तसेच त्यांचे पालकांवर योग्य ती कडक कायदेशीर करवाई करण्यात येईल.

२१/०२

(प्रसाद गोकुळे)
पोलीस निरीक्षक,नियो
वाहतुक शाखा,पिंपरी-चिंचवड